ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 8 | APRIL - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

`` स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतीकारकाची माता- मादाम कामा ``

डॉ. संजय गायकवाड
विभाग प्रमुख-इतिहास , मा. ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.

प्रस्तावना :

भारतीय इतिहासाचे नवे युग इ.स.१८८५ ला सुरु झाले तेव्हांपासून भारतीय समाज व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात लोकजागृती होण्यास सुरुवात झाली. भारतीय राष्ट्रीय चळवळीत सुशिक्षित मध्यमवर्गीय बुध्दीजीवी वर्गाने पाश्चात्य उदारमतवादी आणि जहाल विचार सरणीची प्रेरणा घेत आपल्या चळवळीचे क्षेत्र व्यापक करण्यास मदत केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे मवाळवाद, जहालवाद, गांधीवाद, क्रांतीकारकवाद या चारही प्रवाहाची विचारधारा व कार्यप्रणाली पूर्णपणे भिन्नभिन्न स्वरुपाची होती. आंत्यतिक राष्ट्रवाद भावनेने पेटून उठलेला तरुण ज्यांनी दहशतवादी व क्रांतीकारकवादी मार्गाचा अवलंब केलेल्या क्रांतीकारकांनी सशस्त्र लढा, त्याग, बलिदान, हिंसा या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही अशी त्यांची विचारधारा होती.

भारतीय राष्ट्रवादाची वाढ म्हणजे इंग्रजांच्या संस्था, साधनसामुग्री आणि संधीमुळे मिळालेल्या प्रेरणेने झालेल्या भारतीय प्रतिक्रियांचा परिणाम होय. राष्ट्रवाद आणि आत्मनिर्णयाची भावना संपूर्ण जगात फ्रेंच राज्यक्रांती पासून निर्माण झाली होती. इ.स. १९०५ नंतर जहालवाद्यांचा प्रभाव कमी झाल्याने एक प्रकारचे नैराश्याचे वातावरण निर्माण झाले होते. यातूनच देशातील तरुण क्रांतीकारी चळवळीकडे आकर्षित झाली होती. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच नवा तरुण वर्गाचा गट स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय झाला होता. त्यांनी स्वराज्य मिळविण्यासाठी आत्मविश्वासपूर्वक वेगळ्या मार्गानेही मिळवता येते ही वेगळी भूमिका घेतलेली होती. यातूनच जहालवादी गटाची निर्मिती झाली. भारतीय तरुणांमध्ये इंग्रजांच्या न्यायप्रियतेवर, समानतेवर,शांततामय तत्वावर विश्वास राहिला नव्हता. शांततामय व घटनात्मक मार्गाने काहीही प्राप्त होणार नाही. विनंती,प्रार्थना पत्रे यातून भारताला काहीही मिळणार नाही अशी तरुणांची खात्री होवू लागली. यासाठी युरोपियन साम्राज्यवादाच्या समाप्तीसाठी युरोपियन मार्गच वापरला पाहीजे असा विश्वास तरुण वर्गात निर्माण होवू लागला होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील तरुण गट राष्ट्रीय जहालवादी म्हणून प्रसिध्द होता. भारतीय चळवळीतील तरुण गटाला काँग्रेसच्या ब्रिटीश राजपदाप्रती निष्ठा बाळगणे स्वत:साठी केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळात सदस्यत्व मिळवणे जास्तीत जास्त भाषणबाजी करणे अधिवेशनाला उपस्थित राहणे या राजधर्माच्या पूर्णपणे विरोधात होता.

भारतातील तरुण वर्गावर जगातील इतर घटनांचा जबरदस्त प्रभाव पडला होता. इजिप्त, इराण, तुर्कस्थान, रशिया येथील राष्ट्रवादी चळवळीमुळे भारतीय तरुणांच्या मनात राष्ट्रवादी चळवळीबद्दल नव्या आशा आकांक्षा निर्माण झाल्या होत्या. अशातच दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश वसाहतीमध्ये भारतीयांना मिळणारी अपमानास्पद वागणुकीमुळे तरुणांच्या मनामध्ये ब्रिटीशाविरोधी तीव्र स्वरुपाचा व्देष निर्माण झाला होता. अशातच जपानने बलाढ्य रशियाचा केलेल्या पराभवाने भारतीयांमध्ये प्रचंड प्रमाणात आत्मविश्वास व जोश निर्माण झाला होता. जर जपान स्वत:च्या भरवश्यावर जागतिक सत्ता बनू शकतो तर भारत का नाही अशी भूमिका तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होवू लागली होती. राष्ट्र ही आपली माता असल्याने तिच्या स्वातंत्र्यासाठी परकियांची सत्ता नष्ट करणे व भारतभूमी स्वतंत्र करणे हे क्रांतीकारकांचे अंतीम उद्दिष्ट्ये होते. भारतीय तत्वज्ञानाचा आदर्श समोर ठेवून देशासाठी त्याग करण्याची क्रांतीकारकांची तयारी होती. परकिय सत्तेपेक्षा मरण स्विकारत मृत्यूची मुळीच भिती वाटत नव्हती. हसत हसत फासावर चढणे आणि भारतात पुन्हा एकदा जन्म घ्यावा आणि आपल्या मातृभूमीसाठी जीवन सर्मण कण्याची संधी मिळावी अशी प्रार्थना ते करीत होते. वास्तविक क्रांतीकारक दहशतवाद चळवळ हे कट्टर राष्ट्रवादाचे एक उपांग बनलेले होते.

भारताच्या स्वतंत्र चळवळीच्या इतिहासात क्रांतीकारकांच्या दहशतीवादी चळवळीस एक विशेष स्थान आहे. हिंदुस्थानातील स्वातंत्र्यासाठी क्रांतीकारकांनी ब्रिटीशांमुळे दहशत निर्माण केली होती. क्रांतीकारक प्रखर राष्ट्रवादी व देशासाठी प्राणत्याग करण्याची तयारी

दाखविली होती. भारतातील तरुण क्रांतीकारकांचा एक गट ब्रिटीशांची शासन यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी व्यक्तीगत स्वरुपात क्रांतीकारी मार्गाचा प्रयत्न करुन ब्रिटीशाविरोधी देशासाठी बलिदान करण्यास तयार होता. क्रांतीकारकाला असे वाटत होते की, भारतीयांचे राजकीय धार्मिक स्वातंत्र्य नैमित्तीक मूल्ये भारतीय संस्कृती या सर्वांना ब्रिटीश सत्ता नष्ट करुन टाकेल. भारताच्या विभिन्य भागातील क्रांतीकारकांच्या राजकिय तत्वज्ञानाचे निश्चित स्वरुप नसले तरीही सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे परकिय गुलामगिरीतून मातृभूमीची मुक्तता करणे. पाश्चात्य साम्राज्यवाद फक्त हिंसेच्या मार्गानेच समाज होवू शकतो असा क्रांतीकारकांचा विश्वास होता म्हणूनच क्रांतीकारकांनी आपल्या कार्यपध्दतीत क्रांतीकारकांच्या गुप्त संघटनाच्या माध्यमातून बॉम्ब, पिस्तुलचा वापर केला. त्यासाठी तरुणांचा सहभाग वाढवत त्यांना हत्यारे चालविण्याचे प्रशिक्षण देवून ब्रिटीशांचे मनोधैर्य खच्चीकरण करण्यासाठी हत्या, हल्ला, लूटमार, स्फोट इत्यादी मार्गाचा वापर सुरु केला. स्वतंत्र भारताच्या १९४२ च्या आंदोलनात क्रांतीकारकांनी वेगळ्या मार्गाचा अवलंब केला होता. मात्र त्यांच्या कार्यात संघटीतपणा व योग्य समनवय नव्हता. तरीही क्रांतीकारकांची इन्कलाब जिंदाबाद` ही लोकप्रिय घोषणा संपूर्ण देशाची घोषणा झाली होती. भारतीय क्रांतीकारकांनी ध्येय सिध्दीसाठी हिंसक व सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्विकारला. क्रांतीकारकाच्या कार्याने जनतेत देशप्रेम आणि आत्मबलिदानाची लाटच निर्माण झालेली होती. क्रांतीकारकाच्या कार्यामुळेच भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतीकारकांना आज मातृभूमीसाठी बलिदान करणारे शहीद ` हणून स्मरण केले जातात. त्यातीलच एक महान व्यक्ती म्हणजे मादाम कामा होय.

मुंबई येथील श्रीमंत पारसी व्यक्ती सोराबजी प्रामजी पटेल यांची कन्या म्हणजेच मादाम विकजी रूस्तुमजी कामा होय. मादाम कामा यांचा जन्म इ.स. 1861 ला मुंबई येथे झाला. त्यांना अनेक भाषेचे ज्ञान अवगत होते. वयाच्या 24 व्या वर्षी मुंबईतील प्रसिध्द वकील रूस्तुमजी कामा यांच्याशी त्यांचा विवाह झाला. परंतु तो विवाह दुर्देवी ठरला. शेवटी तर त्यांच्या अंत्यसंस्कारदेखील रूस्तुमजी हजर नव्हते. इ.स. 1896 मध्ये मुंबईत प्लेगची साथ झाली होती. तोच काळ त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला. येथील रोग्यांची सेवाश्रुषा करीत असताना भारतीय राजकीय चळवळीच्या संबंधीत नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. या नेत्यांचा त्यांच्यावर इतका प्रभाव पडला की, त्यांच्या जीवनाची दिशाच बदलली. इ.स. 1901 ला मादाम कामा लंडनमध्ये दादाभाई नौरोजी यांचे सचिव म्हणून काम केले. त्यानंतर त्या श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या इंडीया हाऊस मधील क्रांतीकारक गोटात सामील झाल्या आणि त्यांच्या क्रांतीकारक कार्याची सुरूवात झाली. यावेळी फ्रान्समध्ये अनेक देशाचे क्रांतीकारकांचे वास्तव होते. सरदारसिंग राणा पॅरिस मध्ये पॅरिस इंडियन सोसायटी स्थापना केली. या संघटनेतील मादाम कामा या क्रियाशील सदस्या होत्या. भारतीय क्रांतीकारकात प्रक्षोभ निर्माण करणे, भारतीय क्रांतीकारकांना पैसा पुरवणे, शस्त्रात्रे पुरवणे, भारतातुन पळून आलेल्या क्रांतीकरकांना आश्रय देणे युरोपियन क्रांतीकारकाकडून बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेणे इत्यादी कामात मादाम कामाचा मोलाचा हात होता. येथुनच त्या 'वंदेमातरम ' या पत्रकाचे संपादन करून क्रांतीकारकांचे कार्य युरोपात पोहचवण्याचे काम करीत होत्या. प्रखर राष्ट्र भावनेने प्रेरित झालेल्या मादाम कामा युरोपात सातत्याने प्रचार कार्य करून भारतीयांच्या स्वातंत्र्यकांक्षेची जाणीव युरोपियन जनतेला करून देण्याचा त्यांचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात चालू होता. याचवेळी विनायक दामोदर सावरकर हे स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने लंडनला पोहोचले. तेथे त्यांनी 'फ्री इंडिया सोसायटी ' नावाची संघटना स्थापन केली. मादाम कामाही ब्रिटीश विरोधी चळवळीत सहभागी होवुन ब्रिटनमध्येच भाषणे देत फिरू लागल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणजेच ब्रिटीश सरकारने त्यांच्या राजकीय कार्यावर बंदी घालून त्यांना देश सोडून जाण्याचा आदेश दिल्याने त्यांना फ्रान्समधील पॅरिस येथे आसरा घ्यावा लागला. तेथे त्यांनी न्यु इंडीया सोसायटी स्थापन करून सावरकरांचे कार्य सुरू ठेवले. इ.स. 1907 च्या जर्मनीतील स्टुगार्ड येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी कॉंग्रेसच्या अधिवेशनात हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणुन त्या हजर झाल्या. तेथे त्यांनी भारताचा पहिला राष्ट्रध्वज फडकावण्याचे धाडस केले. त्या ध्वजावर 7 तारे आणि कमळाचे फुल असा तिरंगी ध्वज रातोरात रेशमी कापडावर स्वतः तयार करून दुसऱ्या दिवशी या अधिवेशनात फडकावला. अधिवेशनात उपस्थित असलेल्या विविध राष्ट्रांच्या प्रतिनिधींना साम्राज्यवादी ब्रिटीश सत्तेकडून भारतावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव करून दिली आणि सर्व स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला मदत करावी असे आवाहन केले. मादाम कामा यांनी भारतीयांच्या स्वातंत्र्यकांक्षा जगापुढे मांडल्या . या अधिवेशनाला उपस्थित असलेल्या विविध राष्ट्रांच्या प्रतिनिधीनी उभे राहुन भारताच्या राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. त्यानंतर युरोपात ज्या ज्या ठिकाणी शक्य होईल त्या त्या ठिकाणी हा ध्वज फडकावत राहिल्या. आपल्या भाषणातुन, पत्रकातुन स्वातंत्र्याचा आणि क्रांतीचा संदेश देत राहिल्या युरोपात स्वांतत्र्याचा संदेश देणारी वंदेमातरम, मदन तलवार, दी इंडीयन सोशिऑलीजिस्ट इत्यादी वर्तपत्रावर बंदी घातली असतानाही मादाम कामा अथक प्रयत्नातुन ही वृत्तपत्रे भारताच्या क्रांतीकारकापर्यंत पोहचवत होत्या. त्यावेळी भारतीय क्रांतीकारकांची गीता ठरलेला ग्रंथ म्हणजे वि.दा. सावरकर यांचा '1857 चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथही त्यांच्या प्रयत्नामुळेच भारतात पोहचला. जॅक्सनच्या हत्येवरून मुंबईतल्या सरकारने वि.दा. सावरकर यांच्यावर

अटक वॉरंट काढले होते. त्यानुसार सावरकर यांना व्हिक्टोरिया स्टेशनवर अटक करून बोटने भारताकडे पाठविण्यात आले होते. ही बोट फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरावर थांबली असता तेथुन पळून जाण्यास मादाम कामा यांनीच सांगितले होते. सावरकर पळूनही जाण्यात यशस्वी झाले. त्यांनी फ्रान्स पोलिसांकडे संरक्षणही मागितले मात्र दुर्दैवाने सावरकराचे बोलणे फ्रान्स पोलिसांना समजले नाही . त्यावेळी ब्रिटीश पोलिसांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करून सावरकरांना अटक केली. त्यावेळी मादाम कामा यांनी सावरकरांना फ्रान्सच्या ताब्यात द्यावे व त्यांची सुटका व्हावी. यासाठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली यात यश आले नाही. म्हणून हा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडला मात्र त्यातही त्यांना यश आले नाही. मादाम कामा यांनी ब्रिटीश सत्तेविरूध्दची आपल्या स्वातंत्र्यलढ्याची माहिती अमेरिकेला व्हावी म्हणून त्यांनी अमेरिकेत जावून भाषणे केली ही भाषणे म्हणजे एक प्रकारे भारताच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामाच होता. जी भाषणे अमेरिकेत केली ती भाषणे छापून त्याच्या शेकडो प्रती भारतात पाठविण्याची त्यांनी सोय केली होती. या काळात त्या रशियन, फ्रेंच क्रांतीकारकांच्याही संपर्कात होत्या. रशियन क्रांतीकारक तर त्यांना हिंदुस्थानची ''जॉन ऑफ ऑर्क'' असे संबोधन होते. भारतातील क्रांतीकारकांना तुरूंगात पाठविल्यानंतर क्रांतीकारकांच्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य त्या करीत होत्या. पहिल्या महायुध्दाच्या काळात ब्रिटीश सरकारने मादाम कामा यांना आमच्या स्वाधीन करावे अशी मागणी फ्रान्सकडे केली होती. परंतु फ्रान्स सरकारने ही मागणी फेटाळून लावत मादाम कामा यांना फ्रान्समध्येच स्थानबध्द केले. स्थानबध्द असतानांच त्यांची प्रकृती खालावत गेली. शेवटी 1935 ला आपला स्वातंत्र्यध्वज कवेत घेवुनच त्या भारतात परतल्या. शेवटी 12 ऑगस्ट 1936 ला मादाम कामा यांनी जागाचा कायमचा निरोप घेतला. मादाम कामा यांनी शेवटपर्यंत मदनलाल धिंग्रा यांचे बलिदान व आदर्श यांचे उदाहरण देत देशासाठी त्याग करण्याचे आवाहन करीत होत्या. त्या सतत स्त्री शिक्षणाच्या आग्रही होत्या. आजही मादाम कामा यांना ''सशस्त्र क्रांतीकारकांची माता'' या नावानेच ओळखले जाते.

निष्कर्ष :

१. भारतीय क्रांतीकारकामध्ये संघटीतपणा व योग्य समन्वयचा अभाव होता.
२. भारतीय क्रांतीकारकांमध्ये राष्ट्रवाद व आत्मनिर्णयाची भावना ब्रिटीशांची धोरणे व फ्रेंच राज्यक्रांतीमुळे निर्माण झाली होती.
३. क्रांतीकारकांचा ब्रिटीशांच्या घटनात्मक न्यायप्रियता समानता, शांततामय तत्वावर विश्वास न राहिल्याने सशस्त्र चळवळीचा मार्ग स्विकारला.
४. क्रांतीकारकांनी मातृभूमीच्या मुक्ततेसाठी प्रखर राष्ट्रवादातून सशस्त्र दहशतवादी मार्गाचा वापर करुन देशासाठी प्राणत्यागाची तयारी दाखविली.
५. भारतीय जहालवादी नेत्यांनी तरुणापुढे योग्य व निश्चित दिशा न ठेवता त्यांच्या सर्वस्वाचा त्यागाचे व बलिदानाचे आव्हान केले.
६. क्रांतीकारकांनी ब्रिटीशांच्या जुलमी दडपशाही विरोधात व्यक्तिगतरित्या क्रांतीकारी दहशतीवादी मार्गाचा वापर केला.
७. क्रांतीकारकांना सामान्य जनता अप्रत्यक्षपणे पाठींबा देत असली तरीही ही चळवळ व्यक्ती केंद्रीतच होती.
८. मादाम कामा या परदेशात राहून सतत क्रांतीकारक क्रियाशील काम करणाऱ्या महिला होत्या.
९. मादाम कामा यांनी आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसच्या अधिवेशनात भारताचा ध्वज फडकवणाऱ्या पहिल्या महिला होत्या.
१०.भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अतुलनिय केलेल्या क्रांतीकारकाच्या कार्यामुळे त्यांना क्रांतीकारकांची माता असे म्हणतात.

संदर्भ ग्रंथ यादी :

१. प्राचार्य डॉ. गाढाळ एस.एस. आधुनिक भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद. सप्टेंबर २०१६.
२. ग्रोवर बी.एल. (अनुवाद) डॉ. वेल्हेकर एन.के. एस. चंद्रा ॲन्ड कंपनी प्रा.लि. नवी दिल्ली - २०१५
३. प्राचार्य कदम य.ना. समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन ,कोल्हापूर -एप्रिल २००३
४. डॉ. शिंदे तुकाराम नारायण, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर- जून २०१३.
५. प्राचार्य आचार्य धनंजय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर - जून २००६